# बृ.म.मंडळाचे अभूतपूर्व अधिवेशन

ले.दिवाकर कारखानिस : ह्युस्टन

बृहन महाराष्ट्र मंडळाच्या रौप्यमहोत्सवी अधिवेशनाची मांडवपरतणी अटलांटा येथे चार जूलैला थाटामाटांत साजरी झाली. टाळ्यांच्या गजरांत आणि उल्हासाच्या उद्‌घोषांत, भरल्या डोळ्यांनी संपूर्ण सभाग्रहाने सार्‍या कलावंताना उभे राहून मानवंदना दिली. आतापर्यंत कधीही न पाहिलेले अथवा ऐकलेले दृष्य म्हणजे १६३ स्वयसेवकांनी मिळविलेले मानाचे मुजरे ! संयोजकांना कदाचित यावेळी "सह्याद्रीवरून शेलापागोटे " मिळाले नसतील, परंतु उपस्थितांकडून मिळालेला समयोचित मान आणि संपूर्ण कार्यक्रम यथासांग पार पाडल्याचे श्रेय याचा कलगीतुरा मात्र खात्रीने मिळाला यांत शंका नाही.

या वेळच्या अधिवेशनांत एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली आणि ती म्हणजे संयोजकांनी साथीदारांबरोबर कायम एकजूट टिकवून आणि संघर्षाचे प्रसंग टाळून सर्व कार्य निर्विघ्नपणे पार पाडले. यावेळी खर्‍या नेतृत्वाची कसोटी लावली गेली आणि त्या कसोटीला श्री अजय हौदे आणि राजन वेदक ही युती तावून सुलाखून निघालेल्या शंभरटक्के सोन्याच्या नाण्या सारखी बाहेर आली. या विधानांत कसल्याही तर्‍हेची अतिशयोक्ती नाही.

अधिवेशनाची असाधारण वैशिष्ट्ये :

(१) राजकीय पुढार्‍यांची अनुपस्थिती -: प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे अमेरिकेत साजरे होणारे बृ.म.मंडळाचे व्दैवार्षिक अधिवेशन प्रायः सांस्कृतिक दर्जाचे स्नेहसंमेलन आहे. तो काही भारतीय राजकारणाचा आखाडा नाही आणि हे गमक लक्षांत ठेऊन संयोजकांनी आधी पासून राजकारण आणि राजकीय पुढार्‍यांपासून चार हात दूर राहण्यांसाठी घेतलेली काळजी आणि राखलेले प्रसंगावधान.

(२) अधिवेशनासाठी निवडलेले सभागृह-: अतिशय विस्तृत आणि सोईचे सभागृह निवडण्यांत नियोजकांनी वापारलेले तारतम्य. प्रमुख सभागृहाला संलग्न असलेल्या उपसभागृहांमधील चालण्याचे अंतर अतिशय कमी असल्यामुळे, उपस्थितांची दमछाक झाली नाही.

(३) बसण्याची व्यवस्था -: मुख्य सभागृहांत विभाग पाडून केलेली बसण्याची व्यवस्था सोईची आणि शिस्तबध्द असल्यामुळे "जागापकडण्यासाठी " बा..चा..बा..ची (!) चे प्रसंग टाळले गेले.

(४) भोजन आणि भोजनगृहाची व्यवस्था -: उपस्थितांच्या संखेच्या संदर्भात- लक्षणीय होती असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. जेवण वाढण्याची टेबले आणि जेवणानंतर ती साफ करण्याची तत्परता वाखाणण्या सारखी होती. शाकाहारी जेवणाचे जसे निरनिराळे प्रकार तिन्ही दिवशी होते तसेच रुचकर मांसाहारी जेवणांत सुध्दा वेगळेपणा होता.एके दिवशी बटाट्याची भाजी जरा कमी पडली होती. पण हा प्रसंग विरळा म्हणावा लागेल. काही मंडळींना पुरणाच्या पिठपोळ्या बरोबर तुपाच्या वाटीची वाण भासली असेल तर काहींना पिठपोळ्या ऐवजी तेल पोळ्या जास्त भावल्या असत्या. परंतु हे लक्षांत घेतले पाहिजे की पहिल्या दिवाळसणाचे सासुरवाडीला मिळणारे नव्या जांवयाचे हे जेवण नव्हते.

(५) स्वयंसेवक व्यवस्था आणि सहाय्य :-स्वयंसेवकांची निष्ठा, शिस्त आणि मदत करण्याची तयारी डोळ्यांत भरण्यासारखी होती. प्रत्येक स्वयंसेवकाला काय, कुठे ,कसे अणि केव्हा करायचे ते माहीत होते. ९१ वर्षाचे दादा देशपांडे ज्या आपुलकीने वागत होते त्याच आपुलकीने तरूण स्वयंसेवक विनित आदी आग्रहाने पानांत भाजी वाढत होते. ज्या आदराने सौ.लता लोकरे प्रवेशव्दारावर येणार्‍यांचे स्वागत करीत होत्या , तशाच जिव्हाळ्याने सौ.शलजा मेढेकर आमंत्रितांची चौकशी करीत असलेल्या दिसत होत्या. संयोजक, उपसंयोजक आणि बृहन महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष श्री ठाणेदार फक्त मोजक्यावेळी आणि गरजेपुरतेच रंगभूमीवर येत होते ही लक्षांत घेण्यासारखी गोष्ट होती.

(६) भाडोत्री सूत्रधारांना रजा - पहिल्या दिवशी समारंभाच्या सूत्रधाराचे काम ह्युस्टनच्या सर्वश्रुत वक्त्या सौ. विजू भडकमकर यांनी आपल्या सुन्दर मराठी शैलीत केले. त्या नंतर दुसर्‍या दिवशीचे सूत्रधार कॅलिफोर्नियाचे श्री.मनोज वाडेकर आणि सौ.हेमांगी वाडेकर आणि तिसर्‍या दिवशी शिकागोचे श्री.संजय सावकूर असे हे सर्व चतुरश्र सूत्रधार होते. आपल्यांतही काही गुणी आणि प्रतिभाशाली कलावंत आहेत याची या अधिवेशनांत दखल घेण्यांत आली हे नमूद करण्यासारखे आहे.

(७) प्रमुख पाहुणे आणि वक्ते यांची निवड :- सर्वात महत्वाचा मैलाचा दगड म्हणजे,प्रमुख पाहुण्यांची आणि वक्त्यांची निवड करताना वैज्ञानिक,सामाजिक-साहित्यिक आणि क्रिडा क्षेत्रांतील नामवंत व्यक्तिना पाचारण करून बृ .म .मंडळाची अभिरूची आणि अस्मिता तर वाढविलीच पण त्याजबरोबर एक नवीन आदर्श प्रथा चालू केली.

(८) "परिमल"- स्मरणिका :- या वेळची रौप्यमहोत्सवी स्मरणिका खऱ्या अर्थाने बऱ्याच कालपर्यंत स्मरणांत राहील. अक्षरजुळणी, छपाई, कागद आणि बांधणी अतिशय उत्तम प्रतीची आहे. अभिमानाची गोष्ट अशी की हे सर्व काम पुण्यांतील क्रेस्ट एंटरप्रायझेसने न विलंब लावता केले आणि सर्व प्रती वेळेवर अटलांटाला पोहचल्या. उषा सैदाणे यांची मुखपृष्ठाची संकल्पना अधिवेशनाच्या मध्यवर्ती कल्पनेला आधारभूत आहे. अटलांटांतील स्टोन माउंटनच्या वरच्या अंगास ज्ञानेश्वरांचा फोटो घेऊन , " तयाचा वेलू गगनावरी " या बोधवाक्याचे प्रतिकचिन्हच जणू साधले आहे. स्मरणिकेच्या अंतरंगांत, माननियांच्या माहितीपूर्ण मुलाखती, बृ.म.मंडळाच्या प्रगतीचा मागोवा, काही उपयुक्त माहितीपूर्ण सदरे आणि थोडे ललित लेख समाविष्ट आहेत. सहित्याची आणि संबंधित माहितीचे लेख जमविताना संपादक समितीने या अंकासाठी खूप मेहनत घेतलेली स्पष्ट दिसते. अंकातील फोटो आणि जाहिरातीमधील चित्रे सुबक आणि वरच्या दर्जाची आहेत. एकंदरीत ही स्मरणिका चांगली वाचनीय आहे.

या १२व्या अधिवेशनाच्या कार्यक्रमांचे सिंहावलोकन करताना प्रामुख्याने दोन भाग पडतात. ते म्हणजे (१) बौध्दिक कार्यक्रम (२) मनोरंजनाचे कार्यक्रम

बौध्दिक मेजवानी :-

आमंत्रित पाहुणे आणि सन्मानित वक्ते :

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. विलासराव देशमूख आणि त्यांचे इतर सहकारी मंत्री आणि आमदार महाराष्ट्र राज्यांत उद्योगधंदे वाढविण्यासाठी परदेशी गुंतवणूक मिळविण्याच्या उद्देशाने अमेरिकेच्या दौऱ्यावर होते. या संधीचा फायदा घेऊन , त्यांनी अधिवेशनाच्या Business Convention मध्ये भाग घेण्याचे ठरविले आणि त्याप्रमाणे सयोजकांनी मुख्यप्रधानांचा मान ठेऊन त्यांना अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी उपस्थित राहण्याचे आमंत्रण दिले. त्याला अनसरून श्री. विलासरावजी देशमूख अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी हजर राहिले आणि त्यांनी उत्स्फूर्त भाषण केले. त्यांचे भाषण पूर्वी येऊन गेलेल्या अनेक राजकीय पुढाऱ्यांच्या वक्तव्या पेक्षा वेगळे होते. महाराष्ट्रांतील उद्योगधंदे, व्यापार आणि परदेशी चलनाची आर्थिक गुतंवणूक यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्रसरकार काय प्रयत्न करीत आहे याचा आढावा घेऊन, भविष्यांतील योजनाची त्यांनी दखल घेतली. परंतू सर्वात महत्वाचा मुद्दा त्यानी जो मांडला त्यांत महाराष्ट्रसरकार तुमच्यासाठी- अमेरिकेंत स्थाईक झालेल्यांसाठी काय करू शकेल , कशातऱ्हेने शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व्यवहारात एकत्र येऊन सहकार्य करता येईल याची त्यांनी पृच्छा केली. थोडक्यांत महाराष्ट्र सरकारच्या वतीने त्यांनी प्रथम मैत्रीचा हात पुढे केला. " हे नवलची घडले सगळे " असं सर्व श्रोत्यांना वाटले. या त्यांच्या सर्व भाषणांत निखालस मार्दव आणि प्रामाणिकपणा होता हे निःसंशय ! उपहास, उपरोध अथवा अनुदारता यांचा तिळमात्र लवलेश नव्हता हेही तितकेच सत्य आहे. मुख्यमंत्र्यांचे भाषण जाणकारांच्या चागले लक्षांत राहील असा आम्हाला विश्वास वांटतो.

या नंतर समारंभाचे प्रमुख वक्ते डॉ. रघुनाथ माशेलकर ! फार थोड्या महाराष्ट्रीयांना (त्यांत मी सुध्दां) डॉ. माशेलकरांचे नांव माहीत असण्याचा संभव होता. डॉ. नारळीकर, चितामणराव देशमूख, यांची नांवे पुष्कळच प्रसिध्द होती. विज्ञानशास्त्राचा अथवा केमिकल इंजिनियरींग क्षेत्रांत वावरणाऱ्या लोकांना डॉ. माशेलकरांचे नांव माहीत असणे अगदी शक्य होते. पण अनेकांची या अधिवेशनामुळे डॉ. माशेलकरांची प्रथम तोंडओळख झाली असं म्हटलं तर ते चूक ठरणार नाही. डॉ. रघुनाथजीकडे प्रथम बघितल्यानंतर जे मनावर बिंबून जातं ते त्यांचे साधेपण, निर्व्याज हास्य आणि मनमोकळेपणा ! विव्दत्तेचा दिमाख किंवा वरिष्ठपदाचा अहंकार याचा मागमूसही त्यांच्या चेहऱ्यावर अगर वागणूकीत दिसत नाही. त्याचे भाषण जितके अर्थपूर्ण होते तितकेच कळकळीचे होते. त्यांत भावूकता होती तसाच दुर्दम्य आशावाद होता. जितकी आर्तता होती तितकीच प्रस्थापित निष्ठा होती. भारताच्या प्रगतीची नुसती दिवास्वप्ने नव्हती तर एक प्रकारचा कणखर आत्मविश्वास प्रकट होत होता. त्यांच्या व्यक्तशब्दांत "पंचशील तत्वे " हाच त्या भाषणाचा गाभा होता आणि ती म्हणजे : (१) मुलांना केन्द्र धरून चालविलेली शिक्षणपध्दती (२) स्त्रीकेन्द्रीत कुटुंब संस्था (३) मानवकेन्द्रीत योजना (४) ज्ञानकेन्द्रीत समाज (५) नावीन्यकेन्द्रीत भारत.

डॉ. अनिल अवचटांकडे प्रथम जेव्हा मी पाहिले तेव्हा मला कां कुणास ठाऊक फार वर्षांपूर्वी पाहिलेल्या डॉ. मुंज्याची आठवण झाली. तोच बांधा, तीच शरिरयष्टी आणि तशीच वाढलेली दाढी ! हाताने नेहमी चाळा चाललेला. अस्वस्थ..रेघोट्या काढणारा ! तोंडावर मिस्कील हास्य आणि बोलकी नजर ! डॉक्टरी व्यवसाय सोडून साहित्यांत रमणारा कवी माणूस . बरं आता कविता, साहित्य पुरे म्हटले तर ते नाही. हातात छिन्नी घेऊन दगडात कोरीवकाम करणार नाहीतर रंधा घेऊन लाकूड तासत बसणार ! चित्र रंगवायला कुंचला मिळाला नाही तर त्याच कागदाचे कपटे करून लहानमुलासारखे बोटी , पतंग अगर काही आकृत्या करणार. अगदीच काही हाताशी मिळालं नाही तर ते आपली बांसरी काढणार आणि जोगिया आळवत बसणार ! असा

हा छंदी कलाकार बहुगुणी -बहुरूपी आहे. बोलणं मृदू पण भावनेनं ओथंबून भरलेलं. लहानमुलाची जिज्ञासा आणि भाविकाची श्रध्दा यांचे मिश्रण त्याच्या जीवनाचा केन्द्रबिंदू असावा असा माझा तर्क आहे. श्रीमती उषा मेहता सारख्या व्यासंगी आणि बहुश्रुत व्यक्तीने अभ्यासपूर्वक घेतलेली त्यांची मुलाखत खूपच रंगली. शेवटी त्यांची आवडती बांसरी पूर्वाधनश्रीचे सूर जेव्हा आळवायला लागली तेव्हा तर सभागृह मंत्रमुग्ध झाले.

चौथा दणदणीत कार्यक्रम झाला तो आमच्या सुनिल गावसकरांचा ! हा क्रिकेट छंदी माणूस मोठा गमत्या आहे. बॅटवर चेंडू लागल्यावर लेगला जसा तो सहजपणे चौकार ठोकतो तसेच अनेक चौकार त्याने मंगलाबाई खाडिलकराशी मुलाखत देताना ठोकले. " वा रे वा. . काय मजा आला ! " तसं पाहिलं तर मंगलाबाई निष्णात मुलाखतकार ! त्यांचे कथाकथन किंवा "आरसा " हे कार्यक्रम ज्यांनी पाहिले आहेत, त्यांना त्यांच्या विलक्षण बुध्दिमतेची आणि अभ्यासूवृत्तीची चुणूक या मुलाखतीत दिसली असेलच. आश्चर्य म्हणजे गावसकरांचे मराठी जितके शुध्द होते, त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त प्रभुत्व त्यांचे इंग्रजी भाषेवर दिसले. त्यांच्या बोलण्याची ढब आणि हंसत खेळत "किस्से" सांगण्याची लकब लोभसवाणी होती. भारताचा हा प्रसिध्द क्रिकेटपटू खरंच अगदी खिळाडूवृत्तीचा आहे.

वरील गाजलेल्या बौध्दिक मेजवानीबरोबर आणखी दोन "बौध्दिक " कार्यक्रम पहाण्यांत आले. मला वाटते प्रथमच या समितीने आमच्याकडील लेखक मंडळीसाठी दोन कार्यक्रम संयोजित केले होते. एक होता कथा-कथनाचा आणि दुसरा होता काव्य वाचनाचा. खरं म्हणजे १० लेखकांसाठी योजलेला कथा-कथनाचा कार्यक्रम "कथा-कथनाचा" नसून तो कथा " वाचनाचा" होता. बहुदा ज्यांनी हा कार्यक्रम सादर केला, त्यांना या दोहो मधील फरक कार्यबाहुल्यामुळे लक्षांत आला नसावा. त्यामुळे दोन तासांत दहा लेखकांना आपल्या साहित्याच्या चोपड्या, घाईत आलेल्या भटजीच्या सत्यनारायणपुजेच्या कथेसारख्या अक्षरशः "गुंडाळाव्या" लागल्या आणि "कथामृताला भुकेलेल्या या जगाला" उपाशीपोटी डोळे मिटावे लागले. बिचारे व. पु. किंवा पु. ल. आज हयात असते तर घळघळा रडले असते ही कथाकथनाची विनोदी रडकथा पाहून ! " खोली खाली करो " असे दटाऊन सागणाऱ्या भाडे वसूली करणाऱ्या भैयाची भूमिका डॉ. गर्दे यांना शेवटी घ्यावी लागली. ही झाली कथा-कथनाची शोकांतिका !

काव्यवाचनाचा कार्यक्रम थोडा या पेक्षा वरच्या पातळविरचा होता असे म्हणतात. येथील आणि कॅनडांतील उदयोन्मुख कवीनी आपल्या काही चांगल्या कविता वाचून दाखविल्या त्यांत कांचन कुळकर्णी आणि मनोज ताम्हनकर यांचा गौरवाने उल्लेख करावासा वाटतो.

मनोरंजनाचे कार्यक्रम :-

नेहमीच्या शिरस्त्या प्रमाणे पहिल्या दिवशी अधिवेशनाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम " ज्ञानेश्वर ते विज्ञानेश्वर " यजमान मंडळाने सादर केला. या कार्यक्रमांत कल्पकता आणि नावीन्य होते. पण कधी कधी असं भासत होते की औचित्याला आणि खोल मनांत रुतलेल्या मृदू आदरांच्या भावनांना धक्का देणारे होते असे कित्येक प्रेक्षकांनी बोलून दाकविले. काहीप्रसंगी विनोदापेक्षा विडंबनाकडे कथानकाचा कल झुकत होता असे कित्येकांना वाटले. तरीसूध्दा हा कार्यक्रम संदर झाला असे म्हणता येईल. रंगभूषा, नेपथ्य, प्रकाशयोजना या तिन्ही गोष्टी असामान्य होत्या. डॉ. विद्याधर चितळे यांनी एक नवीन कल्पना हाती घेऊन ती अतिशय प्रामाणिकपणे राबविली. त्यांचा मुख्य उद्देश्य भारताच्या उत्कर्षाचा गतकालापासून ते भविष्यकालापर्यंतच्या घटनांचा मागोवा घेण्याचा असावा आणि त्यांची प्रतिके म्हणून तशी पात्र योजना केली असावी

वेस्टर्न घाट : दुसऱ्या दिवशी मुख्य सभागृहांत न्युजर्सीच्या Theatrics ग्रुपने "वेस्टर्न घाट " हा अतिसुंन्दर कार्यक्रम सादर केला. भारतीय संस्कृती आणि पाश्चीमात्य संस्कृतीचा मिलाफ करुन, भारतीय संगीत- चाली वगैरे- आणि भारतीय व परदेशी नृत्याच्या आधारावर एक सुंदर कथानक सादर केले. ४०-५० मुलामुलींनी या सांघिक कार्यक्रमांत भाग घेतला होता. वेषभूषा, पदन्यास, नृत्य आणि संगीत याची ही बहारदार मेजवानीच होती.

आणखीन एक सुंदर कार्यक्रम मला पहाता आला नाही याची मनाला फार चुटपुट लागून राहिली आहे. तो कार्यक्रम म्हणजे श्री. सुरेश जोशी यानी सादर केलेला Stand-up कॉमेडीचा, अकरा कहावंताच्या समूहाने सादर केलेला, विनोदाने भरगच्च भरलेला कार्यक्रम ! ज्यानी हा कार्यक्रम पाहिला त्यांना अमेरिकेत होणाऱ्या अशाच उच्च दर्जाच्या Stand-up कॉमेडींची आठवण करून देत होता असे बरेच प्रेक्षक सांगत होते. अशाच तऱ्हेचा कार्यक्रम पुढच्या अधिवेशनांत ठेवला जाईल अशी आशा व्यक्त करूया.

एकांकिका :- बऱ्याच एकांकिका अधिवेशनांत सादर केल्या गेल्या. त्यांतल्या त्यांत " डॉक्टर तुम्ही सुध्दां " आणि " वटवट" या चांगल्या झाल्या. त्यांत डावं - उजवं करताना असं वाटतं की " डॉक्टर तुम्ही सुध्दा ! " ही एकांकिका सर्वोकृष्ट झाली असं बऱ्याच लोकांच म्हणणं दिसलं. गाण्याच्या कार्यक्रमांत सौ. सीमा हणमसागर-ह्युस्टन, उषा बाळकृष्णन्-अटलांटा, भारतांतून आलेले राजेन्द्र कांदळगांवकर, डॉ. माधव नगरकर यांनी बरीच गर्दी खेचलेली दिसली, आणि ते कार्यक्रम चांगले झाले. बेला शेंडे आणि हृषिकेश रानडे या गुणी कलावंताना आपले गाण्यांतील नैपुण्य दाखविण्यास जरी पहिल्या दिवशी तेव्हढा वेळ मिळाला नाही तरी तिसऱ्या दिवशींचा त्यांचा कार्यक्रम चांगला झाला. फक्त श्री क्षितीज झारापकर यांनी मधूनमधून केलेली निरर्थक बडबड थांबवली असती तर हा कार्यक्रम आणखी रंगला असता.

पं. सुरेश वाडकर यांनी केलेली निराशा :- पहिल्याच दिवशी मध्यवर्ती सभागृहांत झालेला सुरेश वाडकर यांचा सुगम संगीताचा कार्यक्रम संपूर्णतः निराशाजनक झाला. सुरेश वाडकर तसे गुणी आणि नामवंत गायक आहेत. शास्त्रीय संगीताची त्यांची जाण आणि तयारी भक्कम आहे . तसेच मराठी सुगम संगीतांत ते अग्रेसर आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये त्यांनी नांव कमावले आहे. असं असून सुध्दा खेदाने असे म्हणावे लागते की त्या संध्याकाळी सुरेश वाडकरांची बैठक जमली नाही अणि गर्दीकरून आलेल्या प्रेक्षकांना विन्मुख होऊन परतावे लागले.

हम तो तेरे अषिक है :- मुंबईच्या धंदेवाईक कलावंतानी सादर केलेले हे नाटक अपेक्षेप्रमाणे चांगले यशस्वी झाले. हे नाटक यापूर्वी " आपलं बुवा असं आहे " या नावाखाली रंगभूमीवर आले होते. कथानकाचा मूळगाभा कायम ठेऊन संवादामध्ये काही फेरफार केले आहेत. मूळ नाटकांत प्रशांत दामले आणि वर्षा उजगांवकर यांनी कामे केली होती आणि त्यावेळी सुध्दा हे नाटक खूप गाजले होते. आताचे नाटक मुंबईतली रंगभूमी गाजवीत आहे. हलके फुलके विनोदी कथानक तिन्ही पात्रांनी चांगले उचलले आहे. प्रेक्षकांनी या नाटकाचे चांगले स्वागत केले. हे कमी पात्रांचे नवीन नाटक निवडल्याबद्दल संयोजकांचे अभिनंदन ! या नाटकामुळे अधिवेशनाचे " रणांगण" झाले नाही ही कौतुकाची गोष्ट !

इतर मनोरंजनाच्या कार्यक्रमांत अटलांटाच्या शलजा मेढेकर निर्मीत " गीत शाकुंतल " हा कार्यक्रम सुबक आणि सुटसुटीत झाला. गीत शाकुंतलाचा विषय जरी सर्व परिचीत असला तरी त्याचे छाया नाट्य (Shadow Play) सादर करणे कठीण आहे. वाद्यसंगीत, नृत्य, गीते आणि काव्यमय निवेदन याचा मेळ साधून या छायानाट्याचा प्रयोग सादर करावा लागतो. अतिशय मेहनत घेऊन हा छान नाट्य-प्रकार सादर केल्याबद्दल अटलांटांतील हौशी कलाकार आणि दिग्दर्शक सौ. शलजा मेढेकर अभिनंदनास पात्र आहेत.

आणखीन एक उल्लेखनीय मनोरंजनाचा कार्यक्रम म्हणजे "साज संस्कृतिचा " ! हा प्रयोग सौ. संगीता मयूर हिने तिची आई श्रीमती विनीता चंद्रा याच्या दिग्दर्शनाखाली सादर केला. स्वतः संगीता मयूर ही उत्कृष्ट, शिकलेली नर्तिका आणि अभिनेत्री आहे. अटलाटांतील हौशी गृहिणी, तरूण मुले-मुली यांनी या कार्यक्रमांत भाग घेतला होता. बदलत्या काळाची पाऊले ओळखून आणि विषयाचे तारतम्य राखून या लक्षवेधी चमूने जुन्या-नव्याची मेळ करून गीत आणि नृत्ये यातून त्याचा आविष्कार केला. संस्कृती, भाषा आणि देशप्रेम याची घातलेली सांगड विलोभनीय होती.

वरील कार्यक्रमाव्यतिरिक्त नव्या पिढी साठी तयार केलेला आणि श्री विजय देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली संघटीत केलेला " स्नेह बंधन" हा कार्यक्रम अतिशय नावीन्यपूर्ण झाला असे कळते. . आता पर्यतच्या सर्व अधिवेशनांत "फक्त तरूण-तरूणीसाठी " अशातऱ्हेचा कार्यक्रम सादर केला गेला नव्हता. त्याची माहिती संबंधितांकडून लवकरच प्रसिध्द होईल अशी आशा आहे.

बाराव्या अधिवेशनाची सांगाता :-आणि शेवटी कॅलिफोर्निया आर्टस् असोसिएशन ने सादर केलेली " ऋतुचक्राची अक्षरयात्रा " ही finale—भरत वाक्य. . ., भैरवी . . आणाखीन काही तरी. . इ. इ. ! कॅलिफोर्नियाची finale असल्यामुळे लोकांची उत्सुकता शिगेला पोहचली होती. सॅनहोजेची आठवण कित्येकांना आली आणि गोपाळ मराठे सुध्दा अनेकांना आठवले. पडदा वर गेला आणि एका झाडाखाली बसलेली एक अंधूक माणसाची आकृती आली. संथ संगीताच्या लयीत, एक दीर्घकाळ, न संपणारे कंटाळवाणे पर्व सुरू झाले. या मिश्र काव्य- नृत्य-संगितिकेची मध्यवर्ती कल्पना अशी की "निसर्गाचे ऋतुचक्र आणि त्यासोबत फुलणारी माणसाची नाती " अशी आहे. ग्रीष्म ऋतूपासून ते वसंतऋतू पर्यत निसर्ग आणि मानवी नात्याच्या प्रवासाची एक एक कविता सादर केली गेली असा दावा निर्माते करतात. दुर्गाबाई भागवतांचे ऋतुचक्र " नावाचे एक अतिसुंन्दर पुस्तक आहे. त्यांत केलेली सर्व ऋतूंची वर्णने वाचताना अक्षरशः आपल्या डोळयासमोर ते दृष्य जिवंतपणे उभे राहते. अनेक वर्षापूर्वी सई परांजपे यांनी या पुस्तकावर आधारित शास्त्रीय संगीताच्या निरनिराळ्या रागांवर बसविलेला एक कार्यक्रम मुंबईत सादर केला होता. त्यामुळे ऋतुचक्राचा विषय काही नवा नव्हता. श्री दीपक करंजीकरांनी त्यावर चढवलेला साज तितकासा साजेसा नव्हता असे प्रांजलपणे म्हणावं लागतं. निवडलेल्या कविता आणि त्यांच्या संदर्भात रचलेले संगीत, दोन्हीही, सूर आणि ताल यांच्या कसोटीत

उतरले नव्हते. सबंध अधिवेशनाच्या कार्यक्रमांत जो उत्साह, जे चैतन्य निर्माण झाले होते, ते सर्व या एका अंतीम"यात्रे" ने संपुष्टांत आणले.

Finale म्हणजे कार्यक्रमाचे शिखर..उत्तुंग पर्वत शिखरावर बांधलेल्या मंदिराचा कळस, आनंदाचा परमोच्य बिंदू ..टाळ्यांच्या गजरांत कलावंताना दिलेली मानवंदना ! ही अशी असावी लागते finale !!

असो ! अशा तऱ्हेने हे अधिवेशन संपले आणि ते खूप यशस्वीही झाले. नवीन विचार प्रवाह, नवीन कल्पना आणि नवीन पाऊलवाटा निर्माण झाल्या. एकजूट, शिस्त आणि सहकार्य या त्रयीच्या जोरावर " तयाचा वेलू गगनावरी जरी गेला " नसला तरी हे अधिवेशन, प्रगतीच्या खुणा या भूतलावर नक्कीच ठेऊन गेल्या आहेत. या अधिवेशनाने घालून दिलेले आदर्श भविष्यांत निश्चीतच उपयोगाला येतील याची आम्हाला खात्री वाटते.

बृ.म.मंडळाची नवीन कार्यकरिणी नियोजित झाली आहे आणि पुढले २००७ चे अधिवेशन सियाटल येथे होईल असा अंदाज आहे.
या लेखाचा मुख्य उद्देश्य नवीन कार्यकारिणीचे अभिष्टचिंतन करून , अटलांटाच्या अधिवेशनांत जो "परिमल" निर्माण झाला, त्याचा सुगंध चहूकडे दरवळो आणि पुढच्या अधिवेशनांच्या कार्यात नवीन कार्यकारिणीला असेच भरघोस यश येवो ही सदिच्छा !

-----------------

जूलै २५, २००५